श्री.पोपट मारुती देशमुख, आरोग्य सहाय्यक (पुरुष), तत्कालीन प्राथमिक आरोग्य केंद्र-बोटा, ता.संगमनेर जि.अहिल्यानगर यांचा सेवा निलंबन कालावधी नियमित करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
आरोग्य विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र. आरोग्य/आस्था-३/ ८६३ /२०२५
अहिल्यानगर, दिनांक -१३/११/२०२५

संदर्भ :- १. या कार्यालयाकडील निलंबन आदेश क्र. आरोग्य/का-२/आ.-३/११३५/२००८, दिनांक- १४/१०/२००८
२. या कार्यालयाकडील दोषारोपपत्र / ज्ञापन क्र. आरोग्य/कार्या-२/आस्था-३/२७७/२००९, दिनांक- ३०/०३/२००९
३. या कार्यालयाकडील पुनःस्थापनेचे आदेश क्र. आरोग्य/कार्या-२/आस्था-३/७१३/२००९, दिनांक- २९/०७/२००९
४. या कार्यालयाकडील आदेश क्र. आरोग्य/कार्या-२/आस्था-३/७१४/२००९, दिनांक- २९/०७/२००९
५. मा.सहाय्यक आयुक्त (चौकशी), नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील पत्र क्र. विशा.४/खाचौ/सी.आर.१३५/०९, दिनांक- २५/०३/२०१०
६. या कार्यालयाकडील अंतिम कारणे दाखवा नोटीस क्र. आरोग्य/का.२/आ.३/९८२/२०१०, दिनांक- १४/०९/२०१०
७. श्री.देशमुख यांनी दिनांक- ०१/१०/२०१० रोजीचा खुलासा
८. या कार्यालयाकडील शिक्षेचे आदेश क्र. आरोग्य/का.२/आ.३/११२१/२०१०, दिनांक- ०६/१२/२०१०
९. या कार्यालयाकडील नोटीस क्र.कार्या-२/डीई/१५७/२०१६, दिनांक- २८/०३/२०१६
१०. श्री.देशमुख, यांचेकडील दिनांक- ३०/०९/२०२५ रोजीचे पत्र.
११. महाराष्ट्र नागरी सेवा सेवा (पदग्रहण अवधी स्वियेत्तर सेवा . निलंबन व बडतर्फ यांचे काळांतील प्रदाने) नियम १९८१चा नियम७२ चे (३) (४) (५) (७)

आदेश

श्री.पोपट मारुती देशमुख, आरोग्य सहाय्यक (पुरुष), तात्कालीन प्राथमिक आरोग्य केंद्र-बोटा, ता.संगमनेर येथे कार्यरत असतांना संदर्भ क्र.१ नुसार, श्री.देशमुख, यांनी गैरवर्तन केले असलेने सेवा निलंबित करणेत आलेले होते. संदर्भ क्र. २ अन्वये दोषारोप बजावणेत येऊन संदर्भ क्र.३ अन्वये सेवेत पुनःस्थापिक करणेत आले होते. संदर्भ क्र.४ अन्वये विभागीय चौकशी प्रस्तावित करणेत आली होती. संदर्भ क्र.५ अन्वये विभागीय चौकशी अहवाल प्राप्त झाला. त्याअनुषंगाने संदर्भ क्र.६ ची अंतिम कारणे दाखवा नोटीस बजावणेत आली. संदर्भ क्र.७ नुसार श्री.देशमुख यांनी खुलासा सादर केला. विभागीय चौकशी अहवाल व खुलासा यांचा विचार करुन संदर्भ क्र.८ अन्वये एक वार्षिक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम होणारी एक वर्षासाठी कायमची बंद करणेची शिक्षा अंतीम केलेली आहे.

श्री.पोपट मारुती देशमुख, आरोग्य सहाय्यक (पुरुष), यांचा दिनांक- २३/१०/२००८ ते दिनांक- ०६/०८/२००९ या सेवा निलंबन कालावधीचा निर्णय घेणेची बाब विचाराधिन होती.

या कार्यालयाकडील संदर्भ क्र.९ अन्वये श्री.देशमुख, यांना नोटीस बजावून खुलासा मागविणेत आला होता. संदर्भ क्र.१० नुसार श्री.देशमुख, यांनी पत्र देवून निलंबन कालावधीचा निर्णय होणेबाबत विनंती केलेली आहे.

श्री.पोपट मारुती देशमुख, आरोग्य सहाय्यक (पुरुष), यांचेवरील गैरवर्तनाबाबत एक वार्षिक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम होणारी एक वर्षासाठी कायमची बंद करणेची शिक्षा व श्री.देशमुख, यांनी सादर केलेला खुलासा पहाता, गैरवर्तनाबाबत शिक्षा झालेली असल्याने, महाराष्ट्र नागरी सेवा सेवा (पदग्रहण अवधी स्वियेत्तर सेवा निलंबन व बडतर्फ यांचे काळांतील प्रदाने) नियम १९८१ चा नियम ७२ चे (५) व (७) मध्ये नमूद केलेल्या नियमातील तरतूदीनुसार निम्न स्वाक्षरीत नियुक्ती प्राधिकरणास प्रदान केलेलया अधिकाराचा वापर करुन मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर, श्री.पोपट मारुती देशमुख, आरोग्य सहाय्यक (पुरुष), यांना त्यांचे निलंबन कालावधीत त्यांचे निर्वाहभत्त्यापोटी त्यांना अदा करणेत आलेले वेतन व भत्ते कायम ठेवणेत येत असून, श्री.पोपट मारुती देशमुख, आरोग्य सहाय्यक (पुरुष), यांचा दिनांक- २३/१०/२००८ ते दिनांक- ०६/०८/२००९ हा सेवा निलंबन कालावधी सेवेच्या सर्व कारणांसाठी कामावर व्यथित न केलेला कालावधी धरणेत येत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री.पोपट मारुती देशमुख, आरोग्य सहाय्यक (पुरुष), यांचे मुळ सेवा पुस्तकात घेणेत यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 202511113100261 असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 13-11-2025 11:38:38
(आनंद भंडारी भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,
श्री.पोपट मारुती देशमुख, आरोग्य सहाय्यक (पुरुष),
द्वारा :- वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र-म्हाळादेवी, ता.अकोले

२/- सदरचा आदेश संबंधितांस बजावून बजावलेबाबतची तारखेसह स्वाक्षरीची पोहोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी.

प्रत :- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर
प्रत :- निवडनस्ती.

स्वाक्षरी/-
(आनंद भंडारी भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर